# प्रकरण पाचवे

# 'उपसंहार'

# प्रकरण पाचवे

## उपसंहार

साहित्य ही मानवी जीवनातील प्रतिसृष्टी मानली जाते. जिज्ञासा, उत्कंठा, स्वत:तील गुण, कौशल्य तसेच सुख ,दु:खे इतरांना कळावी, सांगावी ही मानवाची सहज प्रेरणा असते. अशाच कितीतरी गोष्टीतून साहित्याचा उगम झाला असावा असे वाटते. संवेदनशील मन, सुख–दु:खाच्या भावनेचा उद्रेक साहित्य निर्मितीस कारण होते, म्हणजे ''साहित्य हे अंतरमनातील भावउद्रेकाची अक्षर यात्रा असते.'' असे म्हणावेसे वाटते.

पाश्चात्य सहवासाने संस्कृतीने भारतीयांना ब–याच काही चांगल्या गोष्टी दिल्या. त्यात कादंबरीचा उल्लेख अग्रक्रमाणे करावा लागेल. भारतीय कथात्म साहित्यात कादंबरीचा उद्भव पाश्चात्य साहित्याच्या आगमनाने झाला. बाणभट्टाच्या साहित्यातील 'कादंबरी' या नायिकेवरुन नॉवेलला 'कादंबरी' हे मराठी नाव मिळाले.

१९२० ते १९४७ या कालखंडात कादंबरीने बाळसे धरल्याचे दिसते. कादंबरीला ठराविक व्याख्येच्या चौकटीत बसविणे फारसे योग्य ठरत नाही. कारण कादंबरी हा प्रकारच इतका व्यापक आहे की, साचेबंधाने बांधणे त्याला उचित ठरणार नाही. संवेदनशील मनाने टिपलेले प्रसंग, घटना माणूस विस्तृत, सखोल रूपात शब्दात मांडू लागला.

मराठीतील पहिल्या स्वतंत्र कादंबरीचा मान 'यमुना पर्यटन' कडे जातो. या सामाजिक कादंबरीत हिंदू स्त्रीला सोसाव्या लागणाऱ्या दु:खाची वाच्यता केली आहे. बाबा पद्मनजीनी ही कादंबरी हिंदू धर्म दोष व ख्रिश्चन धर्म प्रसार या दुहेरी हेतूने लिहिली आहे. यामध्ये निखळ कलात्म हेतू नाही. त्यानंतर 'मुक्तामाला' ही लक्ष्मणशास्त्री हळवे यांची कादंबरी कलात्महेतूची पूर्तता करते म्हणून ती पहिली स्वतंत्र कादंबरी असेही म्हटले जाते.

शिक्षण प्रसार झाला, मुद्रण कला अवगत झाली. स्त्रियाही शिकू लागल्या. त्यांना अक्षर ओळख झाली. शब्दांचा अर्थ समजू लागला. आणि तिच्याही दडपलेल्या भावना शब्दात आकार घेऊ लागल्या. सुरवातीला वैयक्तिक, कौटुंबिक पातळीवरच घुटमळणारी तिची दृष्टी नंतर समाजातील समस्या निरखू लागली.

स्वातंत्र्यपूर्व काळात विभावरी शिरुरकर यांच्या 'कळ्यांचे निश्वास', 'हिंदोळ्यावर' या कादंबऱ्या आहेत. शांताबाई नायिकरांनी 'लग्नाचा बाजार', गीता साने यांची 'निखळलेली हरिणी', 'माळरानात धुके' इ. कादंबऱ्या लिहून कादंबरी लेखनात स्त्रियांचा सहभाग दाखवून दिला.

स्वातंत्र्योत्तर काळातही अनेक स्त्रियांनी कादंबरी लेखन केले. कुटुंबातून बाहेर पडून समाजाचे दर्शन घेतले. उदा. विभावरी शिरूरकरांची 'बळी'. या कादंबरीतून त्यांनी तळागाळातील लोकांच्या दुःख–वेदनांकडे लक्ष वेधले.

नंतर कांदबरीचे स्वरूप बदलत गेले. १९२० पासून कादंबरी आशयाच्या अंगाने लिहिली जाऊ लागली. सुरवातीला अद्‌भुतरम्य असे तिचे स्वरूप होते. नंतर हरी नारायण आपटे यांनी तिला वास्तवाच्या पातळीवर आणली. नंतर मात्र अनेकांनी सर्वच बाबतीत, वैचारिक, कलात्मक, प्रचारात्मक बाबतीत कादंबरीचे स्वरुप चित्रित केले. डॉ.केतकर, वा. ग. जोशी, ना. सी. फडके, वि. स. खांडेकर, वरेरकर, विभावरी शिरुरकर, रणजित देसाई, सुमती क्षेत्रमाडे, जयवंत दळवी, अशा कितीतरी कादंबरीकारांचे योगदान लाभले.

कादंबरी अद्‌भुतातून मोकळी होऊन बाहेर पडली. स्त्री–पुरुष प्रेम हाच जीवनातील विषय नसतो तर जीवनात समस्याही असतात व तोही कादंबरीचा विषय होऊ शकतो, अशा आशयाच्या कादंबऱ्या लिहिल्या जाऊ लागल्या.

पुढे जाऊन कादंबरीला अनेक प्रवाह मिळाले. त्यामुळे तिचा आता महासागर झालेला पहायला मिळतो. सामाजिक, ऐतिहासिक, राजकीय, धार्मिक, प्रादेशिक, ग्रामीण, दलित संज्ञाप्रवाही, चरित्रात्मक अशा अनेक प्रवाहाने ती समृध्द झाली.

१. हरिभाऊ, वामन बल्लाळ यांनी १९४० या कालखंडात 'रत्नगुंफा', 'साजणी', 'ऐरणीवर' अशा सामाजिक कादंबऱ्या लिहिल्या.

२. राजकीय – सावरकरांनी १९३२ मध्ये काळे पाणी ही अपूर्व कादंबरी लिहिली.

३. धार्मिक – धर्म, रुढी, परंपरा यातून निर्माण झालेले दुःख कादंबरीत चित्रित होते. उदा. सुभाष भेंडे यांची 'जोगीण', ही कादंबरी महादेव मोरे यांची १९७२ सालातील देवदासी जीवनातील 'वर आभाळ खाली धरती' ही कादंबरी आहे.

४. प्रादेशिक – यामध्ये श्री. ना. पेंडसे यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. त्यांनी १९४९ साली सुरवात केली. नंतर र. वा. दिघेंची १९४० साली प्रकाशित झालेली 'पाणकळा' ने प्रादेशिक कादंबरीची कक्षा रुंदावली.

५. ऐतिहासिक – हरिभाऊ आपटेंनी सामाजिक बरोबर ऐतिहासिक कादंबरीचे दालन उघडले. 'वज्राघात' , १८७१ ला गुंजीकरांची 'मोचनगड ' , पटवर्धनांची 'दुसरा बाजीराव' अशा कादंबऱ्या आहेत.

६. पौराणिक – आधुनिक भाषेत सांगितलेल्या पुराणकथा असे स्वरूप पौराणिक कादंब–यांचे असे. वि. स. खांडेकरांच्या 'ययाती' (१९५९) या पौराणिक कादंबरीला मिळालेल्या यशाने अनेकांना प्रेरणा मिळाली.

७. संज्ञाप्रवाही – जागृत, अर्ध जागृत, सुप्त अशा जाणीवा, उणीवा व संवेदनाचा एकाचवेळी होणारा आविष्कार दाखवण्याचा प्रयत्न या प्रकरणात अभिप्रेत असतो. उदा. मर्ढेकरांची 'रात्रीचा दिवस'. सारख्या कादंबरीतून संज्ञाप्रवाहाचा प्रवास सुरु झाला. वसंत कानेटकरांच्या 'घर' मधून हे तंत्र वापरलेले दिसते.

८. मनोविश्लेषणात्मक – मराठी कादंबरीच्या चौथ्या शतकात या प्रकाराला बहर आलेला दिसतो. दडपलेल्या भावनांचा विस्तार व्यक्त केला जातो. 'रणांगण' ही विश्राम बेडेकरांची कादंबरी त्या दृष्टीने महत्वाची वाटते. भालचंद्र नेमाडे यांची 'कोसला', जयवंत दळवी यांची 'स्वगत' इ. या गटातील कादंबऱ्या उल्लेखनीय ठरल्या.

९. चरित्रात्मक – तसा अलिकडचा काळ या कादंबरीचा आहे. ऐतिहासिक, समकालीन व्यक्तिच्या जीवनावर आधारित लिहिले जाऊ लागले. उदा. प्रा. भीमराव कुलकर्णी यांनी हरिभाऊंच्या जन्मशताब्दी निमित्ताने 'हरीनारायण' (१९६४) ही कादंबरी लिहिली.

१०. ग्रामीण कादंबरी – कादंबरीने सदाशिव पेठ सोडून आपला प्रवास ग्रामीण दलित वर्गापर्यंत सुरु केला होता. उदा. र. वा. दिघे यांची 'पाणकळा', 'सराई'. अशा ग्रामीण कादंबऱ्या लोकप्रिय होऊ लागल्या.

११. दलित कादंबरी – स्वातंत्र्यापूर्व काळात दलित वर्ग ही शिक्षण घेऊ लागला. त्यांना ही आपल्या वेदनांना, वाचा फुटावी असे वाटू लागले. त्यातून अनेक कादंबऱ्या आकार घेऊ लागल्या. उदा. अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, नामदेव व्हटकर, नामदेव ढसाळ यांची नावे आवर्जून येतात. अण्णाभाऊ साठ्यांच्या 'फकिरा' (१९५९) 'वैजयंता' (१९५९), 'माकडीचा माळ' (१९६८) इ. कादंबऱ्या तर शंकरराव खरात यांची 'हातभट्टी' (१९७०), इ. कादंबऱ्यांचा उल्लेख करता येईल.

कादंबरीचा जसा अनेक शाखांनी विस्तार झाला. तसाच स्त्रियांनीही आपल्या कादंबरी लेखनाचा आवाका वाढविलेला दिसतो. अनेक स्त्रियांनी विविध विषय हाताळले. नंतर कादंबरी धीट झाली. स्त्रियाही आत्मचिंतन करु लागल्या तेव्हा त्यांच्यातील धीटपणा वाढू लागला. विभावरी शिरुरकर, जोत्स्ना देवधर, निर्मला देशपांडे, शांता पिसाळ, आदी स्त्रियांनी आशयाच्या दृष्टीनेही कादंबरीत चैतन्य भरलेले दिसते.

अलिकडच्या काळात तर स्त्रिया चौकटीच्या मर्यादेत न राहता स्वतंत्रपणे आपले अस्तित्व सिध्द करु लागल्या. शिक्षणाने ती काही प्रमाणात तरी स्वावलंबी झाली. मी माणूस म्हणून जन्माला आले असून कान असून बहिऱ्यासारखे व जिव्हा असून मुक्यासारखे माझे दु:ख मी उरात कोंडून का ठेवू ? असा प्रश्न तिला सतावू लागला. त्यातून तिला स्वत्वाची जाणीव झाली. त्या वेदना, तो संघर्ष कोणत्याही पातळीवरचा असो ती मांडू लागली. आता तिची समस्या फक्त कुटुंबापुरती न राहता सामाजिक पातळीवरचीही होवू लागली होती. त्या आत्मभानातून अनेक स्त्रियांनी कादंबरी लेखन केले आहे.

कमल देसाई, सानिया, गौरी देशपांडे यांच्या कादंब-यातील नायिका उच्च मध्यम वर्गातील आहेत. गौरी देशपांडे यांच्या नायिका धीटपणे, आत्मसन्मान जपत जीवन जगण्याचा प्रयत्न करणाऱ्या आहेत. त्यांची नायिका स्त्री सुलभ नाजुक, भावविभोर स्त्रीत्व कुरवाळत बसणारी नाही. धीटपणे स्वत:च्या मनाशी प्रामाणिक राहण्याचा शक्यतो प्रयत्न करणारी आहे. त्यांची नायिका सर्वत्र भेटणाऱ्या सर्वसामान्य स्त्रीसारखी मनाला मारुन जीवंत राहणाऱ्यांपैकी आढळत नाही. सिगार पिणे, मद्यप्राशन आदी गोष्टींचे तिला स्त्री म्हणून वावडे नाही. त्यांची नायिका उच्चशिक्षित, नोकरी करणारी, परदेश दौरे करणारी, पतीला अरे तुरे करणारी अशी आहे.

विवाह संबंध हे स्त्री पुरुषाचे नाते तिला अपुरे वाटते. ती व्यक्ती स्वातंत्र्य मानणारी आहे. प्रत्येक व्यक्तींच्या निराळ्या समस्या असतात. म्हणून त्यांना समूहमन मान्य दिसत नाही. त्यांचे लेखन व्यक्तिप्रधान आहे.

गौरी देशपांडे यांच्या प्रवृत्तीचा, आचार-विचारांचा तसेच अनुभवाचा प्रभाव त्यांच्या साहित्यावर पडलेला दिसतो. 'विंचुर्णीचे धडे' हा त्यांचा ललित निबंध आहे. त्यामध्ये विंचुर्णी येथे काही काळ त्यांनी वास्तव्य केले होते तेव्हा तेथील जीवनानुभव शब्दबध्द केला आहे. तेथील माणसे, निसर्ग, शेती हे सर्व त्यांनी मोकळ्या मनाने वर्णन केले आहे. स्वत:च्याही स्वभावाचे गुणदोषांसह वर्णन केले आहे. त्यांचे गुरा-जनावरावरील प्रेम, कुत्र्या-मांजरांचा लळा, राहणी, कपडे, खाणे-पिणे, मित्र-मैत्रिणी सारे काही उघडपणे सांगितले आहे. प्रत्येक काम मग ते शेतातील असेल तरी जातीने करणे हा त्यांचा स्वभाव दिसतो. गड्यामाणसांशी वागण्याची त्यांची पध्दतही स्पष्ट होते. हे सारे बघताना असे दिसते की, त्यांच्या स्वभावात शिस्त होती पण तुसडेपणा नव्हता. आपुलकी, स्नेह, सहकार्याचा हात हे गुण पण त्यांच्या अंगी होते हे जाणवते. हे सारे वाचले की असे वाटते त्यांच्या साहित्यातील नायिका ही जवळ जवळ त्यांच्याच स्वभावाचे अनुकरण करताहेत. बऱ्याच बाबतीत. त्यांच्या कथा-कादंबऱ्यातील नायिका उच्चशिक्षित आहे. परदेशी दौरे केलेली आहे पण तरीही भारतीय मातीपासून तिची नाळ तुटलेली नाही. जरी तिचा स्वभाव आत्मसन्मान जपणारा असला तरी ती आत्मकेंद्री नाही. शेती-वावर, गुरे-जनावरे, कुत्री-मांजरी यांच्यावर मनापासून प्रेम करणारी आहे. कथानक लिहिणाऱ्या तिच्या हातांना शेतकाम करायचीही लाज वाटत नाही. परदेशी वास्तवाचा अनुभव घेतलेले तिचे मन खेड्यातील निसर्गातही रमते.

साहित्य हे अजब रसायन आहे , कधी ते स्त्री-पुरूषांमधल्या नातेसंबंधाचे विश्लेषण करते. कधी व्यक्ती व समाज यांच्या मधील संघर्षाची कथा रंगवते. कधी या साऱ्यांच्यापुढे जाऊन शाश्वतमुल्ये, नियम व मानवी भविष्य यांचा वेध घेते. हे सारे घटक एकमेकांपासून पूर्णपणे अविभक्त रहात नाहीत. अनेक वेळा ते एकमेकांत मिसळतात. लेखकाच्या प्रतिभाशक्तीवर त्यांचे एकमेकांत मिसळणे अवलंबून असते. गौरी देशपांडे यांची 'गोफ' कादंबरी याचे उत्तम उदाहरण आहे.

त्यांची पात्रे सुजाण, समंजस असतात. समाजाच्या रूढ चौकटीत ती मावत नाहीत.पण चौकटी मोडण्याचा अभिनिवेश त्यांच्यात आढळत नाही. स्वत:च्या जगण्यातून निर्माण होणारी नीती ती पाळतात. कादंबरीतील घटना प्रामुख्याने मानसिक पातळीवर घडतात. आवश्यक मजकूर सोडल्यास इतर फापट पसारा नसतो.

व्यक्तिचित्रण पुरेसे पण मोजकेच असते. शैलीचा फुलोरा नाही. ही सारी वैशिष्टये 'गोफ' या कादंबरीस लागू पडतात. एकमेकांच्या मनातील अहंकार, भीती व अविश्वास यांचा तिढा सोडवून (आनंदा-जसपालसकट) सारे एकत्र येण्याचा गोफ कसा विणायचा हा कादंबरीतला मुख्य प्रश्न आहे.

प्रश्न सगळयांच्याच जीवनात असतात. काही माणसे त्या प्रश्नांच्या, दु:खाच्या दलदलीत फसून जातात. हताश, अगतिक होतात. पण गौरी देशपांडे यांच्या कादंबरीतील माणसे विचारी असतात. ती आपल्यापुढील प्रश्नांचे स्वरूप समजावून घेतात. प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी मार्ग शोधण्याचा प्रयत्न करतात. त्या प्रयत्नात वसुमती सारखी माणसे संतापून बेधडक प्रश्नाला भिडतात तर मां सारखी माणसे टक्के-टोणपे खात जगण्यातून आलेल्या अनुभवांतून सहनशीलतेने मार्ग काढतात. जगात कुणी कुणाचं भलं करत नसतं. प्रत्येकाने आपले कर्तव्य करायचे असते. एकमेकांना धरून रहायचं असतं. असा मुक संदेशच जणू या कादंबरीतील पात्रे देतात. कादंबरीच्या शेवटी सारे एकत्र येतात.

'उत्खनन' ही गौरी देशपांडे यांची शेवटची कादंबरी आहे. ही लहानशी कादंबरी सन २००२ साली प्रकाशित झाली होती. जीवनभर आपला स्वशोध, स्वत:च्या अस्तित्वाचा शोध सुरू असतो हेच जणू नायिका सुचवत आहे. त्यामुळे 'उत्खनन' हे कादंबरीचे नाव प्रतीकात्मक वाटते. नाईकेच्या जीवनाशी संलग्न वाटते.

दुसरे म्हणजे 'उत्खनन' हा नायिकेचा व्यवसायही आहे व प्रवृत्तीही आहे. हे उत्खनन केवळ भूतकाळाचे नसते तर वर्तमानाशी त्याची सतत सांधेजोड करावी लागते. आणि ते मानवी नाते संबंधा विषयी असेल तर सतत त्याचा उलगडा पाडावा लागतो. 'उत्खनन' ची नायिका दुनिया सतत हा प्रयत्न करीत असते.

आई, मुल हे जीवशास्त्रीय नाते सोडले तर इतर सर्व नाती मानवी समूहाच्या सामाजिक, सांस्कृतिक रचनेची फलिते आहेत. माणसाचे सामाजिक , सांस्कृतिक भान जसे प्रगल्भ होत जाईल तसा त्या नात्यातील समजूतदारपणा अधिक वाढत जाईल. असेच काहीसे गौरी देशपांडे 'उत्खनन' या कादंबरीतून सुचवू पाहतात.

गौरी देशपांडे यांच्या सर्वच लेखनात 'स्वातंत्र्य' हे महत्वाचे मूल्य सतत अग्रभागी दिसते. तसेच कामावरची निष्ठा, प्रेम, समता इ. मूल्ये व्यापक अर्थाने त्यांच्या लेखनातून पात्रांच्या वर्तनातून, संवादातून, निवेदनातून सूचित होतात.

मानवी समाजाचा इतिहास पहाता मानवी नातेसंबंधाविषयी काही चाकोरीबध्द कल्पना, संकेत असतात. हे संकेत गौरी देशपांडे नाकारतात. हे नाकारताना मानवी वर्तनाच्या नव्या शक्यता त्या सूचित करतात. हया नात्याच्या ठराविक कल्पना त्यांची पात्रे नाकारतात. उदा.लग्ना आधीच दिवस गेलेल्या मुलीला काहीही आक्रस्ताळेपणा न करता आई-वडील ते पत्करतात, आधार देतात. दयाळ हा दुनियाचा नवरा पत्नीच्या पहिल्या प्रियकराला ब्रेनटयूमरच्या ट्रीटमेंटसाठी बोलावून घेतो. मणी दयाळचा वडील म्हणून स्वीकार करते.

'उत्खनन' मधील नायिका दुनिया, दयाळ, मणी, आई, बापू इ. पात्रे व्यक्ती म्हणून वावरतातच. तसेच ठिपक्या, जंब्या, भटक्या ही कुत्री - मांजरे ही पात्रे स्वतंत्र व्यक्ती म्हणून वावरतात. या कुत्र्या - मांजरांनाही स्वत:ची मते/मूल्ये आहेत. उदा.'जब्बारचा पाय घरात पडला की लुच्च्या गायब होतो !'

'उत्खनन' मध्ये गौरी देशपांडे यांनी पात्रांचे अनेक पॅटर्न रंगविले आहेत. उच्चमध्यमवर्गीयांच्या भाषेत, नायिका दुनियाच्या निवेदनातून, स्वगतातून कादंबरी साकारते. अशाप्रकारे उत्खनन कादंबरीतून माणसाचे अपूर्णपण सूचित होते. माणूस हा बदलणारा, वाढणारा असला तरीही त्याचे अपूर्णपण समजून घेणे हा 'उत्खनन' कादंबरीचा गाभा आहे.

गौरी देशपांडे यांच्या 'गोफ' आणि 'उत्खनन 'या कादंबऱ्यातील उपरोक्त विवेचनानंतर खालील निष्कर्ष काढता येतात. शिक्षणमहर्षींच्या स्त्री शिक्षण प्रसारामुळे स्त्रिया शिकू लागल्या,लिहू लागल्या.विविध चळवळी आणि सुधारकांच्या शिकवणीतून स्त्रियांना आत्मभान आले .स्त्री शिक्षणाची ध्वजा उंचावणाऱ्या सुधारक स्त्रीकैवाऱ्याचा वारसा सांगणारी कौटुंबिक पार्श्वभूमी गौरी देशापांडे यांचे व्यक्तिमत्त्व घडवण्यास कारण झाली.

शिक्षण,विचार-आचाराचे स्वतंत्र ,आर्थिक स्वतंत्र यामुळे गौरी देशापांडे यांचे व्यक्तिमत्त्व 'स्वतंत्र' व प्रज्ञावंत बनले. आपल्या लिखाणातून समाजसुधारणा घडवून आणण्यासाठी त्यांनी लेखन केले. विचुर्णीचे धडे या त्यांच्या आत्मकथनपर पुस्तकात त्यांच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू स्पष्ट होतात. भारतीय व पाश्चात्य या दोन्ही समाज संस्कृतीचा जाणतेपणाने अनुभव घेऊन त्यांनी जीवनविषयक ठाम अशी धारणा बनवली होती. त्यानुसार त्या जगल्या, वागल्या आणि त्यांच्या व्यक्तिमत्वाचे प्रतिबिंब त्यांच्या लेखनात उमटले.

त्यांच्या लेखनात स्त्री-पुरूषांचे चित्रण माणूस म्हणून येते. या व्यक्तिरेखा तटस्थ आणि वैचारिक पातळीवर स्त्री-पुरूषाचे चित्रण माणूस म्हणून येते. या व्यक्तिरेखा तटस्थ आणि वैचारिक

पातळीवर वावरतात. भावना प्रधान होत नाही. देशी व विदेशी जीवनशैलीतील तफ ावत जाणवल्यामुळे येथील स्त्रीच्या 'चालवून घेण्याच्या' गुलामी वृत्तीची लेखिकेला घृणा वाटते. स्त्रीच्या स्थितीला ब-याच अंशी स्त्रीच कारणीभूत आहे. या जाणीवेतून त्यांचे लेखन झालेले आहे.

माणसाला माणूसच म्हणून वागणूक देण्याच्या त्यांच्या विचारसरणीमुळे घरा-दारातील कोणत्याही व्यक्तीला समानतेने वागणूक देण्याची त्यांची धाटणी आहे. घरातील, नात्यागोत्यातील माणसे व गडी माणसे या सर्वांना समानतेने वागणूक मिळते. वाळीव प्राणी आणि वाढवलेली झाडे झुडपे यांचा लळाही त्यांना आहे. याचे प्रत्यंतर त्यांच्या कादंबर-यामधून येते.

'विवाह' या संकल्पनेकडे पारंपारिक रूढ अर्थाने न पाहता परिवर्तनवादी दृष्टीने पाहून व्यक्ति स्वातंत्र्याच्या संकल्पनेतून स्त्री-पुरूष लैंगिक संबंध हा वैचारिक देव-घेवीसारखा एक संवाद म्हणून पाहणा-या स्त्री व्यक्तिरेखा गौरी देशपांडे यांच्या कादंबरीत येतात.

निसर्गातील वनस्पती, पिके, पशुपक्षी जितक्या स्वाभाविकतेने लेखिकेच्या लेखनात येतात. तितक्याच स्वाभाविकतेने माणसांचे मुक्त जगणेही त्यांच्या लेखनात येते. पुरूषाचे जगणे-वावरणे, व्यसन करणे जितक्या सहजपणे होते तितकेच व तशीच स्वरूपाचे स्त्रीचेही चित्रण गौरी देशपांडे यांच्या कादंबरी त येते.

गौरी देशपांडे यांचे लेखन 'स्त्रीवादी' म्हणून पोज घेऊन येत नाही. ते स्वाभाविकतेने येते. त्यांच्या कादंबरीतील स्त्री, विवाह, पुरूष, लैंगिक संबंध, गर्भसंभव, बाळतपण, वांझपण या सारख्या स्त्री-शरीराशी संबंधीत बाबींकडे पारंपारिक विचारसरणीने न पाहता नव्या, परिवर्तनशील, बुध्दिप्रामाण्यवादी दृष्टीने पाहणारी आणि तरीही त्याचा यत्किंचितही आव न आणणारी अशी आहे. प्रेम ही व्यक्तिगत आवड आणि लग्न ही सामाजिक कायदेशीर घटना अशा दोन भिन्न गोष्टींच्या अर्थाची गफलत ती करीत नाही.

गौरी देशपांडे यांच्या कादंबरीची नायिका पारदर्शी व्यक्तिमत्वाची, बिनधास्त, पण स्वत: बरोबर इतरांचे स्वातंत्र्य जपणारी आहे. तिचा संघर्ष आर्थिक स्वरूपाचा नसून 'स्त्रीवादी' आहे. ती स्वत: कमावणारी असून दुबळी, हळवी, भावनांचे प्रदर्शन करणारी नाही. खोटेपणा, ढोंग, बेरकीपणा, छक्केपंजे करणारी, धूर्त, धोकेबाज अशी नसून सडेतोड आणि स्पष्ट मते मांडणारी आहे. ती समाजाकडे, स्वत:च्या अस्तित्वाकडे आणि स्वत:ला मिळणा-या स्थानाकडे जागरूकतेने पाहते.

गौरी देशपांडे यांच्या जवळजवळ सर्वच कादंबरी लेखनातील स्त्री परदेशात जाणारी–राहणारी, दोन्ही समाज संस्कृतीतील विशेष जाणीवपूर्वक अंगिकारणारी आहे. त्यात ती आपल्या माणूसपणाचे जागरूकतेने रक्षण करते. एकूणच त्यांच्या कादंबरीतील स्त्री बंडखोर, धीट, पारंपारिक नीती–अनीतीची भ्रामक बंधने मनातही न आणणारी स्वतंत्र अशी आहे.

गौरी देशपांडे यांची कादंबरी आटोपशीर, कमी व्यक्तिरेखा असणारी आहे. भाषेत नेमकेपणा असल्याने पाल्हाळ नाही. भावनांचे प्रदर्शन नाही तसे वैचारिक शब्दजंजाळ नाही. त्यामुळे वाचकांशी संवाद साधण्यास त्यांची भाषा यशस्वी होते.

गौरी देशपांडे यांची कादंबरी आशयाच्या अंगाने वेगळी आहे. त्यातील संघर्षाचे स्वरूप स्त्रीवादी आहे. त्यांच्या कादंबरीतील स्त्री व्यक्तिरेखा विलक्षण व वेगळी आहे. तिचे पारदर्शी व्यक्तिमत्व सर्वच बाबतीत आहे. म्हणून ती काळाच्याही पुढे गेली आहे. तिच्या व्यक्तिमत्वाला वैश्विक संस्कृतीचे संदर्भ आहेत. त्यामुळे तिचे नागरिकत्व वैश्विक ठरते. नव्या युगातील नव्या विचार–आचारांची ती बंडखोर नायिका आहे.

तात्पर्य, गौरी देशपांडे यांची कादंबरी आशयाच्या अंगाने वेगळी आहे. त्यातील कथानकाची पार्श्वभूमी, त्यातील संघर्षाचे स्वरूप जसे वेगळे असते तसेच त्यातील स्त्री समकालीन पाश्चात्य किंवा पौरात्य स्त्रीपेक्षा वेगळी, स्वतंत्र, व्यक्तिस्वातंत्र्याचा आदर व स्वीकार करणारी, मुक्त विचाराबरोबर आचार करणारी, मानववादी अशी आहे. गौरी देशपांडे यांच्या स्त्रीवादाचे स्वरूप हे असे 'स्वतंत्र' आहे.

गौरी देशपांडे यांच्या 'गोफ' व 'उत्खनन' या कथांचा अभ्यास करताना उगमा पासून नव कादंबरी पर्यंतच्या कादंबरीचा विकास कसकसा टप्प्याटप्प्याने होत गेला, यात लेखक लेखिकांनी कसकसे योगदान दिले त्यांच्या लेखनवैशिष्ट्यांसह थोडक्यात परामर्श घेण्याचा प्रयत्न केला आहे. गौरीताईंचे व्यक्तिमत्व व वाङ्मयीन व्यक्तिमत्व मला जे भावले ते येथे नोंदविले आहे. त्यांच्या कादंबरी लेखनाची वाङ्मयीन वैशिष्ट्ये, वाङ्मयीन सौंदर्यासह उलगडून दाखवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. ते सर्वमान्य होईलच असे माझे मत नाही पण एक निखळ संशोधकाच्या भूमिकेतून मी हा अभ्यास माझ्या परीने चिकित्सेने करण्याचा प्रयत्न केला आहे. व्यक्ती आणि वाङ्मय यांचे अतूट नाते कादंबरीतून जाणवते. त्यांचे साहित्य व्यक्तिनिष्ठ, आत्मनिष्ठ, अनुभवनिष्ठ आहे.